# पं. मनोहर कासलीकर यांचा बंदिशीकडे बघण्याचा सौंदर्यात्मक दृष्टीकोन

स्मिता प्रभाकर देशमुख

**प्रस्तावना :**

कुठल्याही गोष्टीची सौंदर्यात्मक मिमांसा करणे हे काम तसं अवघड आहे. कारण सौंदर्य हे व्यक्तीसापेक्ष असतं आपण केलेलं कार्य समाजाच्या दृष्टीने खरोखर सौंदर्यात्मक आविष्कार घडवून आणणारं झालंय का, हे सिद्ध करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागते, म्हणूनच हे कार्य शिवधनुष्य उचलुन दाखवण्यासारखं आहे.

अशाच अवघड कार्यासाठी पं मनोहर कासलीकरांनी आपलं सगळं आयुष्य खर्ची घातलं आणि त्यांच्या या महान कार्याला मान्यता देखील मिळाली. संगीत जगतामध्ये त्यांनी घडवून आणलेले आविष्कार खरोखर संगीत तज्ज्ञांना, निष्णात अभ्यासु विद्यार्थ्यांना, एकूण सर्व संगीत क्षेत्रातील व्यक्तींना अत्यंतिक उपयोगी ठरला. त्यांचा बंदिशीकडे बघण्याचा दृष्टीकोन म्हणजे, बंदिशीतील प्रत्येक बाजू ही अर्थवाही असावी असं त्यांना वाटत असे, आणि ते येण्यासाठी त्यांनी जे बदल करण्याचं धाडस दाखवलंय तेच वाखाणण्यासारखं आहे

विषयदृष्टीने अध्ययन

मुळात बाळासाहेबांचा घरंदाज पारंपारिक असणाऱ्या बंदिशीमध्ये बदल करावे असं का वाटलं हाच मुळ मुद्दा आहेजो बाळासाहेबांच्या अतुलनीय प्रतिभेवर प्रकाश टाकणारा ठरतो जे आहे ते चुकीचं आहे का, त्यात काय उणेपण आहे, काय बदल केले म्हणजे सौंदर्य वाढेल, सोप होईल, कुठल्या बंदिशी निवडाव्या, त्यासाठी तालबद्धता कशी असावी, शब्द तसेच असावे की बदलावे, शब्दांच्या जागा बदलाव्या का, या व या सारख्या अनेक प्रश्नांच काहुर मनात घेऊन, कुठेही रागाच्या चलनाला इजा न करता, पुन्हा नव्याने बंदिश मांडणे हे बाळासाहेबांच्या पुढंच मोठं आव्हांनच होतं. ते स्विकारुन अभ्यासु विद्यार्थ्यांकरिता तरी मी हे निश्चितच केलं पाहिजे ही तळमळ होती. त्यांचा मुळ स्वभाव या कार्याला प्रवृत्त करीत होता. कारण गुणगुणलेलं लिहीण्याची त्यांची जुनी सवय होती. या सवयीतूनच त्यांच्या हातून हे सौंदर्यात्मक बदल घडले जे संगीत क्षेत्रामध्ये नवीन आविष्कार ठरले.

तशी पं. भातखंडे यांच्या काळात होती तशी आजच्या काळामध्ये बंदिशीची कमतरता नाहिये आज अनेक बंदिशीची पुस्तकं उपलब्ध आहेत, त्यात ग्रंथांची ही भर पडली आहे

या सगळ्या बंदिशीच्या साठ्यामध्ये बाळासाहेबांनी सौंदर्यात्मक बदल केलेल्या बंदिशींना न्याय मिळेल की नाही अशी शंका येते ही शंका त्यांनी न बाळगता कार्य अविरत सुरु ठेवलं त्यांच्या सिडीज आणि कॅसेटस् वरुन सर्वांचीच ही शंका फिटली

बाळासाहेबांच्या मते, पं. भातखंडे यांनी संकलीत केलेल्या बंदीशी जशाच्या तशा गाण्याचा प्रयत्न केला तर काहीतरी निश्चित चुकतयं असा भास होतो आणि शंका असलेलं गायन म्हणजे ह्दयाला भीडणारं नसेल हा विचार करुन बदल करुया हे ठरलं.

दोन तीन आवर्तनामध्ये केवळ स्थायी आणि तिही विलंबीत लयीत गायल्याने बंदिशीचा डौल बिघडेल, सौंदर्य हरवल्यागत भास होईल. हे बाळासाहेबांच्या लक्षात आलं, यावर काय उपाय करावा, तर पुन्हा नव्याने या बंदिशी मांडणे एका एका आवर्तनामध्ये स्थायी -अंतरा तालबद्ध करणे ही साधारण व्यक्तीची बाब नाही. जो स्वतः उत्तम गायक कलाकार आहे आणि अध्यापनाचा दीर्घ अनुभव आहे अशीच व्यक्ती हे कार्य करु शकेल ज्या निकषामध्ये बाळासाहेब उतरतात.

निरंतर अभ्यास, संगीताचा ध्यास आणि संगीतच श्वास आसणाऱ्या बाळासाहेबांना हे अवघड नव्हतं कारण बडे गुलाम अली खाँ साहेबांचे ते गंडाबंध शागीर्द होते, निसार हुसैन खाँ, विलायत खाँ, वझेबुवा, फैय्याज खाँ, राम मराठे निवृत्ती बुवा सरनाईक, गजानन बुवा जोशी यांचेसारख्या ज्येष्ठ गायकांची लयदारी आत्मसात केल्याने समस्या आणि उपाय दोन्ही उमजले. आज विलंबित लयीची जी संकल्पना प्रचलित आहे तिच्यानुसार पं भातखंडे यांनी दिलेले मोडे विलंबित ख्याल म्हटले असता काही वेळा जे अकलात्मक वाटतात आणि जर भातखंड्याच्या काही प्रचलित व अभिप्रेत असणाऱ्या लयीत (म्हणजे आजच्या मध्यलयीपेक्षा किंचीत कमी असणाऱ्या लयीत) गाईले तर आलापात संथपणा आणि तानामध्ये द्रुतता राखणे कठीण होऊन

बसते. यावरचा कासलीकरांना सुचलेला उपाय काहीसा असा की तीन चार आर्वतनाची बंदिशी आणि तिच्यातली स्वररचना आणि विद्यार्थ्यांची सोय लक्षात घेऊन बसवायची तर तिला एकेका आवर्तनाच्या स्थायी अंतऱ्यात बसवायला हवी. आणि हाच उपाय त्यांनी योजला. पण एका गोष्टीकडे संगीत साधकाचे लक्ष वेधू इच्छितो की स्थायी अंतरा एकेका आवर्तनात कित्येक ठिकाणी बाह्यातः केवळ सरलीकरण वाटते. तरी अंातरिक दृष्टया तिथे कासलीकरांची मार्मिक अशी लयप्रधानता संयुक्तीक आहे आणि ही गोष्ट ध्वनीफितीत कासलीकरांनी स्वतः गाउन दाखवून तिची प्रचिती आणून दिली आहे तसेच पं मनोहर कासलीकर यांना पं. भातखंडे यांचे क्रमिक पुस्तकातील बंदिशी व त्या बंदिशीवर स्वरसौंदर्याचे साज चढविणे हा त्यांचा आवडता छंद होता हा सांगितिक विचार करत असतानां त्यांनी विद्यार्थी अभ्यासू गायक -कलाकार या या गटांचा मनाचा शोध घेऊन त्यांना त्या बंदिशी कशा प्रकारे आकर्षित करता येईल हा त्यांचा संकल्प होता खरे पाहले असता हा कासलीकर घराण्याचा हा एक प्रकारचा छंद होता. त्यांचे वडिल बंधु बाबुराव यांनीसुद्धा तो जोपासला या बंदिशीचे पुनर्लेखन करीत असताना बाळासाहेबांनी भर घातली.

घरंदाज बंदिशीचा त्यांच्या चिंतनात विचारांचा लाभ अनेकांना व्हावा व हे मौलिक मार्गदर्शन पुढील अनेक पिढ्यांना मार्गदर्शक ठरावे हे त्यांचे उदिष्ट होते. हे कार्य करत असताना पं. भातखंडे यांनी रागांच्या स्वरचित व संकलित अशा विपुल बंदिशी प्रसिद्ध केल्या आहेत. फार प्रयासाने प्राप्त केलेल्या या बंदिशी प्रसिद्ध केल्या आहेत, या बंदिशी विविध घराण्याच्या असल्याने त्यामध्ये वैविध्यताही आली आहे. अशा बंदिशींचा संगीतातील स्वरस्थाने दर्जे, श्रुती, त्यांचे उच्चारण या क्रिया केवळ लिहून वाचून आत्मसात करणे अशक्य असल्याने गुरुमुखी संस्कारांनी बंदिशीची तालीम मिळणे अत्यावश्यक आहे. असे ते आवर्जून प्रतिपादन करीत असत. त्यांच्या ध्वनीमुद्रणाची रागांचे बंदिशी ऐकल्यानंतर त्यातील रागरुप तालांच्या डौल, बोलाचे, ढंगदार, उच्चारणा मांडण्याचे कौशल्य ज्ञात होते. तसेच त्या घरंदाज गायकी प्रस्तुतीचा ढंगही समजतो. एकुणच बंदिशीचे स्वरबद्ध लिखाण व गायनावरुन हा भाग अभ्यासकांना आकर्षित करु शकतो.

प्रत्येक स्वरसमुहात स्वरांचे अतंर्गत संतुलन असेल आणि दोन स्वरसमुहातील लयांतर संतुलित असेल तर ती बंदिश निश्चितच आकर्षक ठरते. बंदिश जेव्हा एखाद्या तालात निबद्ध होते तेव्हा बंदिशीतील अंतर्गत लयीला मुर्तरुप प्राप्त होते समान मात्रांचे विविध ताल आहेत पण प्रत्येकाचे व्यक्तीमत्व निराळे आहे हे व्यक्तीमत्व बंदिशीतुनही प्रकट होत असते अर्थात त्यासाठी त्या त्या तालाच्या बोलाशी खंडाशी सुसंगत अशी बंदिश निश्चितच आकर्षक ठरते. काही बंदिशी लवचिक असल्याने वेगेवगळ्या तालात त्या चपखलपणे बसतात म्हणुनच विविध घराण्यानुरुप विविध तालात ही त्या सौंदर्यपुर्ण रितीने मांडता येतात ज्या बंदिशीत समेची चाहुल मिळते ती बंदिशही आकर्षक होते स्थायीतील अंतीम स्वरावलीची रचना कुशलतेने करुन त्यांचे विसर्जन जर मुखड्यात झाले तर समेचा आनंद मिळतो त्यामुळे कमनीय आकृतीबंधाची रागमुर्ती आकर्षक ठरते आकर्षक बंदिशमध्ये शब्दाईतकेच काव्यालाही महत्वाचे स्थान आहे. आकर्षक मुखडा बनवण्यासाठी नामधुर शब्दांची समेवर गुंफण मुखड्यांची सौंदर्यपुर्ण रचना यांचे मोठे योगदान आहे तर काही वेळा मुखड्याचे अनाघाती उच्चारण तसेच आकर्षकता मुखड्याच्या सौंदर्य वाढविता येते. हे सगळे घटक बाळासाहेबांच्या बंदिशीमध्ये येतात.

संगीतातील एकुण दहाही थाटांच्या विश्लेषणात्मक सौंदर्याचा शोध बंदिशीद्वारे घेण्यात आलेला आहे. विशेषतः त्यातील स्वरसंगत-लय, सौंदर्य-ताल सौंदर्य या बाबतीत पं. मनोहर कासलीकरांनी केलेले जे सौंदर्यात्मक बदल आहेत व ती बंदिश गाताना अतिशय कलात्मक ढंगदार पद्धतीने गायील्या जाते तेव्हा त्या रागाची व गायकीची रंजकता जाणकारास व तज्ञांना आल्याखेरीज राहवत नाही. रागाचा जर भव्य महाल बांधायचा असेल तरतो स्वरवाक्यांच्या स्तंभाने उभा करायला हवा याची जाणीव त्यांना झाली. रागाचे आरोह-अवरोह हे प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्याला शिकण्यासाठी दाखविलेली पाऊलवाट आहे. रागातील बंदिश सुंदर मांडायची असेल तर रागातील आवक जावकाती पद्धत मांडणीतील विविधता- मींड-गमक-खटका बेहलावे लय तालाचे कनखंद्याना स्पर्श करणारी सौंदर्य प्रस्तुत बंदिशीत आहे व त्याचा सुयोग्य उपयोग बाळासाहेबांनी केला तसेच बाळासाहेबांचे गायन ऐकताना ख्यालाच्या आलाप तान शब्दफेक या सर्वात लय स्पष्ट दिसते कारण त्यांच्या जवळ लय तालाचे अनुभवजन्य ज्ञान होते. त्यांच्या ख्याल गायनातील ताल व लयींचा विचार केल्यास आपणांस दिसते की विलंबीत ख्यालासाठी त्यांनी बहुदा त्रिताल -एकताल ठेका वापरत आहे हे ताल वापरण्यामागे अनेक कारणे दिसुन येतात हा ठेका सर्व सामान्य रसिकांना झुमरा-तिलवाडा यांच्या तुलनेत अधिक समजतो त्यामुळे विशिष्ट ठेका लावल्यास श्रोते मात्रा मोजत राहून गाण्याकडे दुर्लक्ष

होण्याचा संभव असतो. तालातील मात्राच्या सुक्ष्मतम् भागावरही त्यांची पकड असे.

वास्तविकत: रागांचे प्रामाणिकरण कधी देता येणारच नाही कारण परिवर्तन हीच धारणा आहे. पुर्वी बिहाग एकाच मध्यमाने फुलवल्या जात असे आज दोन मध्यम घेऊन गातात. अशी अनेक उदाहरणे देता येईल. बदलत्या काळात रागाची अनेक रुपं उलगडत जातात, त्याचं मुळ स्वत:च व्यक्तीमत्व उरतच नाही

सौंदर्यात्मक बदल म्हणजे नेमकेपणाने बाळासाहेबांना काय अपेक्षित होते, रागातला भारदस्तपणा (रागाच्या स्वभावानुसार) आवाजातील बोज रागशुद्धता, राग प्रकृती सांभाळणे रागरुप चलन तालाचा गुढ अभ्यास, लयीची बांधली, पुर्वांग उत्तरांगाच्या समतोल, बंदिशीचा मुखडा, समेची सलामी (अचुक) बंदीशीची मुखडा ज्यात खरी बदलाची गरज वाटली, रागांची निवड, बंदिशीची निवड, या सगळ्या बाबींचा कलात्मक विचार करुन रागाकृती निर्माण होण्याकरिता, काही प्रचलित आणि काही अप्रचलित घरंदाज बंदीशी घेऊन बाळासाहेबांनी ज्यांच नुतनीकरण करुन श्रोत्यांपुढे ठेवलं त्याला शब्द अपुरे पडतील अशा ख्यालशैलीच्या निर्माण झालेली रचना जिला आपण बंदिश संबोधतो, ती बंदिश म्हणजे बाळासाहेबांच्या दृष्टीकोनातुन रागनामक पुर्णत्वाचे संकलित रुप होय

**निष्कर्ष :**

बाळासाहेबांच्या ख्यालाची बंदीश ही धुपदाच्या बंदिशीतून विकसीत झाली असली तरी ती अनेक दृष्टीने वैशिष्ट्येपुर्ण आहे. यात तालवैविध्य आहे. बंदिशीचे आणखी एक महत्व म्हणजे ख्याल गायनात निरनिराळी घराणी असल्याने घराणेदार बंदिशींना वेगळेच मानाचे स्थान प्राप्त होते. हे करीत असताना रागचलन आणि राग प्रकृतीचे भान ठेवणे आवश्यक आहे. तसेच रागातील स्वरांचे अल्पत्व बहुत्व रागातील महत्वाच्या स्वरसंगती तसेच ऱ्हस्व दीर्घ स्वरांचे महत्व ज्ञान व ताल लयीची नजर बंदिशीची गुणवत्ता ही बंदिश बांधणी बरोबर ती पेश करण्याच्या ढंगावर ही अवलंबून असते. उत्तम गायक बंदीशीचे सोने करतो. बाळासाहेबांनी बंदिशीची बांधणी व बंदिशी मध्ये राग स्वरुप प्रतिबिंबीत होणे अत्यावश्यक असते व कलाकारांच्या भावभावनांची उत्स्फुर्त व सौंदर्यपुर्ण अभिव्यक्ती असते. परंतु ती कलाकृती सौंदर्यपुर्ण असावी बंदीश जर योग्य संवादतत्वांनी बांधलेली रागातील स्वरांची अचुक लयीत गुंफण केलेली असेल तर अशी बंदिश आकर्षक ठरते व अर्थातच श्रोत्यांचे लक्ष वेधून घेते पं. कासलीकरांनी याबाबत खूप सूक्ष्म व सखोल चिंतन केलेआहे असे मला वाटते.

**संदर्भ सुचि**

1) हिन्दुस्थानी संगीत क्रमिक पुस्तक मालिका
2) संगीत विशारद
3) घरंदाज गायकी